SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



VOLUME IX, ISSUE I
April 2020

OPEN ACCESS

ISSN 2277 - 8071
IMPACT FACTOR 5.411
DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
INDEXED IN 52 DATABASES

J-Gate INDEXED

# RESEARCH NEBULA

AN INDEXED, REFEREED & PEER REVIEWED QUARTERLY JOURNAL

Chief Editor

DR. GANESH PUNDLIKRAO KHANDARE
Yashwantrao Chavan Arts and Science Mahavidyalaya,
Mangrulpir Washim Maharashtra
ganukhandare7@rediffmail.com
gpkenglish@gmail.com
Cell 919850383208

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Dist.Hingoli.(MS.)

JOURNAL FACTOR

WEB BASED JOURNAL MANAGEMENT SYSTEM

Scholarsteer
Scholarly Information

WWW.YCJOURNAL.NET



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

ISSN 2277-8071 Impact Factor 5.411

**April 2020 Volume IX, Issue I**

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN

**Edited & Published by**

**DR. GANESH PUNDLIKRAO KHANDARE**
Yashwantrao Chavan Arts & Science Mahavidyalaya,
Mangrulpir, Washim, Maharashtra
ganukhandare7@rediffmail.com
Cell: +91-9850383208.
www.ycjournal.net

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli (MS.)

| S.No. | Author(s) | Title | Page |
|---|---|---|---|
| 1. | DR. RAJIV BHIMRAO KAMBLE<br>Assistant Professor & Head<br>Department of English<br>ACS College, Lanja<br>Dist- Ratnagiri | AN IMPLICATION OF MULTICULTURAL REPRESENTATION IN MARGARET LAURENCE'S *THE STONE ANGEL* | 15 |
| 2. | DR. BALKRISHNA N. MAHAJAN<br>Arts, Science and Commerce College, Chikhaldara, Dist. Amravati (M.S.) | REFORMS IN BANKING SECTOR: AN INDIAN SCENARIO | 22 |
| 3. | DR. ARCHANA KESHAVRAO DESHMUKH<br>Assistant Professor,<br>Department of Commerce,<br>Nagnath Art's Commerce and Science College,<br>Aundha Nagnath, Dist. Hingoli (MS). | MAHATMA GANDHIJI's PANCHAYAT RAJ AND INDIAN CONSTITUTION | 28 |
| 4. | प्रा. डॉ. प्रदिप टी. वाकोडे<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती राधाबाई सारडा कला–वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती (महा.) | एक देश – एक भाषा | 31 |
| 5. | प्रा.डॉ. नवीन गिलबिले<br>मराठी विभाग प्रमुख<br>नागनाथ महाविद्यालय, औंढा (नाग.) | तुकारामाचे व्यक्तिमत्त्व | 34 |
| 6. | प्रा.डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र<br>तत्वज्ञान विभागप्रमुख<br>शिवाजी महाविद्यालय, हिंगोली | भारतीय तत्वज्ञानात स्त्रियांचे स्थान | 38 |
| 7. | प्रा. भुसारे गोदावरी नारायणराव<br>तत्वज्ञान विभाग<br>संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय परभणी | न्यायदर्शनाची ज्ञानमीमांसा | 41 |
| 8. | प्रा.प्रविण श्रीकृष्ण राऊत<br>स्व. बापूरावजी देशमुख कनिष्ठ महाविद्यालय<br>माजरखेड (क.) ता. चांदूर रेल्वे जि.अमरावती | छत्रपती शिवाजी महाराजांचा धर्माबाबतचा दुष्टिकोन : ऐतिहासिक विश्लेषण | 45 |



SHIVAJI COLLEGE HINGOLI
T.C. Lecturer Shivaji College, Hingoli Ta.& Dist.Hingoli (MS)



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

10.22183
22183/RN

An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071
Impact Factor 5.411

Research Paper in Philosophy

RESEARCH NEBULA | MEMBER OF Crossref | OPEN ACCESS | INNO SPACE SJIF Scientific Journal Impact Factor | doi

# भारतीय तत्त्वज्ञानात स्त्रियांचे स्थान

प्रा.डॉ. गुसारे सुनंदा रामचंद्र

तत्वज्ञान विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली

**ABSTRACT**

*भारतीय दर्शन आणि भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान या संदर्भाने विचार करत असतांना आपल्या भारतीय वैचारिक बैठकीचा आधार घ्यावा लागतो. भारतीय संस्कृतीचा विचार करत असताना भारतीय संस्कृतीही पुरुष प्रधान संस्कृती आहे. म्हणून त्यांच्या वैचारिक बैठकीतही कुठेही स्त्रियांना मानाचे स्थान असल्याचे दिसून येत नाही. भारतीय समाजरचना ही चार वर्ग आणि वर्णात विभागलेली असली तरी त्या पैकी कुठल्याच वर्णात स्त्रीला स्थान नाही. ते वर्ण म्हणजे ब्रह्मण, क्षेत्रीय, वैश्य आणि शूद्र. वर्ण व्यवस्थेच्या जाळयात भारतीय समाज रचना आजही आडकलेली आहे. पण पुरूषप्रधान समाज रचना असल्या कारणाने ब्राह्मण असो की शूद्र त्या ठिकाणी पुरूषाचाच विचार केला जातो. या ठिकाणी आठरापगड जाती बार बलूते हे सर्व असले तर कुठल्याही वर्ण जाती मध्ये स्त्रियांना स्थान दिसत नाही. प्राचीन कालखंडापासून ती आस्तित्वहीन जीवन जगताना आपल्याला दिसून येते.*

तत्त्वज्ञान हा शब्द तत्त्व + ज्ञान दोन शब्दापासून तयार झाला आहे. त्यातील तत्त्व या शब्दाची फोड केली असता 'तत् +'त्त्व' अशी होते. तत् म्हणजे पलीकडले, म्हणजेच या विश्वाच्या पलीकडे जे आपल्या इंद्रियांनी दिसू , जाणवू शकत नाही ते. एक अव्यक्त शक्ती. तर 'त्त्व' म्हणजे 'पणा' या तत्त्वाचा ततपणा म्हणजे 'सार' तत्त्व. जसे मणुष्याचा 'मणूष्यपणा' म्हणजे मणुष्यात्व, वैशुंचा पशुपणा म्हणजे पशुत्व, मातेचा मायाळुपणा म्हणजे ममत्व / मातृत्व तसेच तत्चा तत्पणा म्हणजे तत्त्व असा अर्थ होतो. तर तत्त्वज्ञान या पूर्ण शब्दाचा अर्थ पहिला असता तत्वाचे अथवा तत्वांचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान असा अर्थ केला जातो.

इंग्रजीमध्ये तत्त्वज्ञानाला Philosophy असा शब्द आहे.Philo आणि Sophia या दोन ग्रीक शब्दापासून हा शब्द तयार झाला आहे.Philo म्हणजे 'प्रेम' आणि Sophia म्हणजे 'शहाणपणा' त्या दोन्हींचा मिळून अर्थ होतो 'शहाणपणा विषयीचे प्रेम' म्हणजे तत्त्वज्ञान होय.

ब्रह्म स्वरुपाविषयीचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान असा ही एक अर्थ आपल्याला घेता येतो. भारतीय तत्त्वज्ञाना संदर्भात आणि भारतीय लोकांच्या मानसिकते संबंधी विचार करत असताना एक गोष्ट लक्षात येते ती, म्हणजे भारतीय संस्कृतीनुसार मानवी ज्ञानाचे प्रयोजन काय ? तर मानवा दृष्टीने या विश्वाच आधारभूत तत्त्व काय ? त्याचा शोध घेणे ही भारतीय मानवाची जिज्ञासा या पाठीमागे असलेली दिसून येते. म्हणजे मानवाने ज्ञान मिळवायचे पण कशाचे?आणि कशासाठी ? हे दोन प्रश्न महत्त्वाचे आहे. पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे की, या विश्वाच्या बुडाशी असलेले आधारभूततत्त्व कोणते? याचा शोध घेणे हे भारतीय लोक आपले कर्तव्य माणतात किंवा त्यांच्या जिज्ञासेतून ते जाणवते. तर दुस–या प्रश्नाचे उत्तर आहे की, ब्रह्मस्वरुपा विषयीचे ज्ञान हे मोक्ष प्राप्तीसाठी मिळविले पाहिजे. आता मोक्षा या शब्दाचे अनेकांनी वेगवेगळे अर्थ घेतले आहेत. आणि भारतीय माणसाचे सर्वोत्कृष्ट प्राप्तव्य काय असेल तर ते म्हणजे मोक्ष होय. तर मोक्ष म्हणजे मुक्ती, मोक्ष म्हणजे सुटका. मानवी जीवनात उदभवत असलेल्या दु:खांमधून सुटका किंवा मुक्ती म्हणजे मोक्ष असा अर्थ घेतला जातो. म्हणजेच दु:खापासून मुक्ती आणि सुखा, अत्यंतिक किंवा निर्भेळ सुखाची प्राप्ती म्हणजे मोक्ष, म्हणजे मोक्ष म्हणजे ब्रह्मी स्थिती असेही म्हणता येते. म्हणून आपल्याला असे म्हणता येते की,हे ब्रह्म म्हणजेच अंतिम ज्ञेय वस्तू होय. त्या ज्ञेय वस्तू पर्यंत जाणे म्हणजे तत्त्वज्ञान होय.

तत्त्वज्ञानाला दर्शन असाही शब्द प्रयोग केला जातो. अंतिम सत्याचे दर्शन म्हणजे तत्त्वज्ञान अशाही एक व्याख्या तत्त्वज्ञानाची करता येते. पर्यायाने त्या अंतिम सत्याचे दर्शन म्हणजे तत्त्वज्ञान असे आपण म्हणत असतो. मानव हा जिज्ञासू प्राणी असल्यामुळे त्याना अनादि काळापासून एक प्रश्न भेडसावत आला आहे आणि तो म्हणजे या विश्वाचे मूळ काय. म्हणजेच अंतिम सत्य काय आहे. ते शोधून काढने होय. भारतीय जणमाणसाचे तर ध्येय तेच आहे. जीवन मुक्ती किंवा जन्ममरणाच्या फे–यातून मुक्त होणे. असाही अर्थ घेतला जातो.

भारतीय तत्त्वज्ञानात जिज्ञासेला महत्त्वाचे स्थान आहे ती जिज्ञासा आहे विश्वातील अगम्य अशा असंख्य रहस्या बद्दलची, ती जिज्ञासा आहे जे सहजा सहजी प्राप्त होत नाही अशा प्राप्तव्याची ती जिज्ञासा आहे त्या अनादी, अनंत, आगाध, अपरिमीत, नित्य कुटस्थ नित्य अशा असिम तत्वाला प्राप्त करण्याची ते मिळवण्याची म्हणून भारतीय माणूस हा मोक्ष प्राप्तीसाठी म्हणजेच अंतिम सत्याच्या ज्ञानासाठी जगतो आहे. पर्यायाने तत्त्वज्ञाना बद्दल प्रेम दाखवतो आहे. जिज्ञासा दाखवतो

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist. Hingoli (MS)



Scanned with OKEN Scanner

आहे.भारतीय तत्त्वज्ञाना समोरील काही प्रश्न आहेत ते म्हणजे मूलतत्त्व अस्तित्वात आहे काय? आहे तर किती? श्रुतीला प्रमाण मानायचे का? इश्वराचे अस्तित्व आहे का आणि असल्यास का मानावे? आत्मा अमर आहे काय? या प्रश्नांभोवती भारतीय तत्त्वज्ञान हे सतत गोल–गोल–फिरत असते. वरील सर्व प्रश्ना बद्दल तीव्र मतभेद. गोंधळ असूनही भारतीय मन मात्र सतत त्याच्याच भोवती रुंजी घालतांना दिसून येते. वरील अंतिम प्रश्नांची चर्चा ही भारतीय तत्वज्ञानाचा प्रमुख विषय असलेली दिसुन येते. विश्वाच्या बुडाशी मूलतत्त्व किती या प्रश्नाच्या उत्तरा बाबत भारतीय तत्त्वज्ञानात असंख्य आणि तिव्र असे मतभेद आहेत. काहींनी हे मूलतत्त्व एक आहे असे सांगितले. त्यांना एकतत्त्ववादी म्हटले. काहींनी ते दोन आहे असे सांगितले त्यांना द्वितत्त्ववादी तर काहींनी ते तत्त्व अनेक आहेत असे सांगितले त्यांना अनेक तत्त्ववादी असे म्हटले गेले. तसेच ज्यांनी हे तत्त्व चेतन आहे असे मानले त्यांना चैतनतत्त्ववादी तर ज्यांनी हे तत्त्व जड आहे असे मानले त्यांना जडतत्त्ववादी मानले.

भारतीयांच्या वैचारिक जडण घडणीत महत्त्वाचा वाटा आहे तो म्हणजे वेद, श्रुती आणि स्मृती इत्यादी पुराण ग्रंथाचा. भारतीय तत्त्वाज्ञानात सर्व प्रथम दोन गट पडतात ते श्रुतीवरुन ते म्हणजे आस्तिक आणि नास्तिक म्हणजे जे श्रुतीने सांगितले तेच सत्य म्हणजे श्रुतीमध्ये सांगितलेले ज्ञानच फक्त सत्य असे माणणारे आस्तिक आणि श्रुतीनी सांगितलेले ज्ञान मान्य नाही असे माणणारे नास्तिक ढोबळ मानाणे त्यामध्ये सांख्य–योग, न्याय, वैशेषिक उत्तमिमांसा पूर्वमिमांसा हे आस्तिक तर चावार्क, जैन, बौध्द हे नास्तिक दर्शन होत.

इश्वराच्या आस्तित्वा संबंधी विचार करत असतांना असे म्हणावे लागते जे ईश्वराचे आस्तित्व मान्य करतात ते सेश्वरवादी आणि जे ईश्वराचे आस्तित्व मानीत नाहीत ते निरीश्वरवादी होत. वरील नऊ दर्शनांपैकी त्याची विभागणी केली असता वेदांत, न्याय, योग वैशेषिक हे सेश्वरवादी म्हणून ढोबळ मानाने म्हणता येतील. तर चार्वाक, जैन, बौध्द, व पूर्वमिमांसा हे निरीयवरावादी होत. त्यात वरील पैकी वेदांताचा ईश्वर हा माया विशिष्टच ठरत व मायेचा निचरा झाल्यास ईश्वरही राहात नाही म्हणून ते ही निरीश्वरतेकडेच वळताना दिसतात. सांख्या मात्र निरीश्वरवादीही नाही आणि सेश्वरवादीही नाही.

आत्म्याच्या आस्तित्वा संदर्भात विचार करतांनाही आपल्याला तेच दिसून येते. जे आत्म्याचे आस्तित्व मानतात ते आत्मवादी म्हणवतात. तर जे आत्म्याचे आस्तिव मान्य करत नाहीत ते अनात्मवादी म्हणून संबोधले जातात. जैन, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग पूर्वमिमांसा आणि वेदांत हे सर्व आत्म्याचे आस्तितत्व मान्य करतात म्हणून ते आत्मवादी ठरतात. तर फक्त चार्वाक आणि बौध्द हे दोनच दर्शन अनात्मवादी होते याचा अर्थ असा नाही की ही दोन दर्शने पूर्णतःच आत्म्याचे आस्तित्व नाकारतात पण त्यांनी नित्य आत्मा नाकारला आहे. आत्म्याचे अमरत्व त्यांना मान्य नाही.

अशा प्रकारची भारतीय दर्शनाची वैचारिक बैठक आहे हे आपण पाहिले आहे. त्यानंतर भारतीय दर्शन आणि भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान या संदर्भाने विचार करत असतांना आपल्या भारतीय वैचारिक बैठकीचा आधार घ्यावा लागतो. भारतीय संस्कृतीचा विचार करत असताना भारतीय संस्कृतीही पुरुष प्रधान संस्कृती आहे. म्हणून त्यांच्या वैचारिक बैठकीतही कुठेही स्त्रियांना मानाचे स्थान असल्याचे दिसून येत नाही. भारतीय समाजरचना ही चार वर्ग आणि वर्णात विभागलेली असली तरी त्या पैकी कुठल्याच वर्णात स्त्रीला स्थान नाही. ते वर्ण म्हणजे ब्रह्मण, क्षेत्रीय, वैश्य आणि शूद्र. वर्ण व्यवस्थेच्या जाळयात भारतीय समाज रचना आजही आडकलेली आहे. पण पुरूषप्रधान समाज रचना असल्या कारणाने ब्राह्मण असो की शूद्र त्या ठिकाणी पुरुषाचाच विचार केला जातो. या ठिकाणी आठरापगड जाती बार बलूते हे सर्व असले तर कुठल्याही वर्ण जाती मध्ये स्त्रियांना स्थान दिसत नाही. प्राचीन कालखंडापासून ती आस्तित्वहीन जीवन जगताना आपल्याला दिसून येते.

विशेषतः वैदिक कालखंडामध्ये स्त्रीही नगण्य स्थान असलेली, अस्तित्वहीन जीवन जगणारी आपल्याला पहायला मिळते. मनुस्मृतीने आणि वैदिक ग्रंथानी जरी सांगितले असले की 'यत्र नार्यंतु पुज्यंते' तरी वैदिक काल खंडामध्ये स्त्रियांवर जी बंधने आली ती आजतागायत काही प्रमाणात टिकून आहेत. जैविक दृष्टिकोनातून विचार केला आसता स्त्री आणि पुरुष यांची काही शारीरिक आवयव सोडता सर्व सामान आहे. परंतू सामाजिक दृष्टया पाहिले असता मात्र हे दिसून येत नाही. निर्णय स्वातंत्र्य असेल, मालकी हक्क असेल,मालमत्ता बाळगण्याचा हक्क असेल एक ना अनेक स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात भारतीय संस्कृतीने कुठेच माघार घेतलेली दिसत नाही.

वर्णाश्रम व्यवस्थेचा विचार करत ब्राह्मण श्रेष्ठ ब्राह्मण स्त्री मात्र अस्पृश्य आणि अधिकारहीन, तेच वैश्य आणि क्षत्रीय वर्णाचे ही आहे. एवढेच काय पण शूद्रस्त्रीही अस्पश्यच आहे. जात धर्म कोणताही असला तरी स्त्री मात्र शूद्रती शूद्रच. कारण धर्माची धर्मसुत्रे तयार करणारा हा पुरुष असतो. त्यामुळे त्याने समाजातीक स्त्रियांना निकृष्ट दर्जा देण्याचे दृष्कृत्य केले आहे हे आपल्या लक्षात येते. या संदर्भात अनेक उदाहरणे देवून डॉ. आ.ह. साळुंखे यांनी आपल्या ' हिंदु संस्कृती आणि स्त्री' या ग्रंथात वर्णन केले आहे. पुराव्यानिशी सिध्द केले आहे. वैदिक कालखंडात धर्ममार्तडांनी स्त्रियांना बंधनात टाकले. स्वतःच्या सोईसाठी त्यांनी स्त्रीला समाज बहिस्कृत

SHIVAJI COLLEGE HINGOLI
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



124

SHIVAJI COLLEGE HINGOLI

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN | An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences | ISSN 2277-8071 Impact Factor 5.411

केले म्हणायला हरकत नाही. समाजातील शेवटचा वर्ग म्हणजे शूद्र हा समाज बहिस्कृत होता. त्याच प्रमाणे स्त्रीही समाज बहिस्कृतच आहे. फक्त पुर्णपणे बहिस्कृत म्हणायला काही आडचणी येतात म्हणून पुरूषप्रधान संस्कृतीने ते केले नाही. आडचणी हया की स्त्रीला बहिस्कृत, अस्पृश्य म्हणावे तर घर कोणी सांभाळायचे. मग घरात प्रवेश देता येणार नाही. स्वयंपाकघर ही तिच्याच हातात ठेवावे लागते तसेच मुलांचे संगोपणही तिच्या हातूनच करावे लागते. म्हणून समाजातील स्त्रीला पूर्णतः अस्पृश्य मानता आले नाही ही पुरुष प्रधान संस्कृतीची मोठी आडचण होती. म्हणून तिला आहे ही नाही आणि नाही ही नाही अशा प्रकारचे स्थान समाजात देण्यात आलेले दिसते.

धार्मिक कार्यक्रमांचा विचार केला असता तिथे स्त्री ही अस्पृश्य असलेले आपल्याला दिसून येते. चुल–मूल, रांध, वाढा, आणि खरकटी काढा या स्वरूपातच स्त्रीला बांधून ठेवण्यात आलेले दिसते. आजही धार्मिक स्थळांचा विचार केला असता ही गोष्ट प्रकर्षाने आपल्याला जाणवते. दोन वर्षापूर्वीचा शनीसिंगनापूरचा प्रवेश लढा, त्या अगोदर कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरातील प्रवेश बंदी तर आजही सुरू असलेला शबरीमला मंदिर प्रवेश लढा ही सर्व प्रकरणे कशाचे सूचक आहे हे आपल्याला लक्षात येते.

या ठिकाणी दोन पध्दतीने विचार करता येतो. तो म्हणजे ईश्वर आराधाना नाही केली तरी चालते कारण ईश्वर आस्तित्वात आहे किंवा नाही माहिती नाही. पण असे केले तर पुरूषप्रधान मनाला ठेच पोहचते की स्त्रीही उध्दट आहे. ती देवादिकाला मानत नाही. पण देवपूजा केली तरी समस्या की स्त्रीही अस्पृश्य आहे. तिच्या सहवासात ईश्वर प्रसन्न होत नाही. खरे तर करावी अशा बुध्दीमत्तेची. ज्यांना स्त्री तर हवी आहे पण ती नकोही आहे. अशा मानसिकतेमुळे फक्त नावापुरते स्त्रीला धार्मिक कार्यात स्थान दिले जाते. पण प्रत्यक्षात मात्र तिला नाकारले जाते. हे तर असेच झाले की, 'धरले तर चावते आणि सोडले तर पळते' अशी मानसिकता या पुरूष प्रधान धर्ममार्तंडाची झालेली दिसून येते. ज्या मातेच्या पोटी जन्म घेतात त्याच आस्तित्वाला आयुष्यभर नाकारत राहणारा हा पुरूष समाज जो स्वतःच स्त्री आस्तित्वा संबंधी सतत आक्रमक राहीला आहेत्र. लग्नाची बायको तर हवी पण सत्यनारायण करताना फक्त तिने पुरूषाच्या कोपराला हात लावावा एवढीच हवी. तिने स्वतः पूर्ण पूजा केली असता ती पूजा अपवित्र होते कारण स्त्रीही अपवित्र आहे असे पुरूष प्रधान संस्कृती म्हणते.

संराश रूपाने असे म्हणता येते की, भारतीय समाज रचना वैचारिक दृष्टया कितीही प्रगल्भ झाली असली तरी स्त्रियांच्या संदर्भात मात्र अजूनही अविकसीतच आहे असेच म्हणावे लागते. साधा माणूस म्हणून जगायला देण्याचा अधिकारही हा समाज स्त्रियांना देवू शकत नाही. पण हे ही तेवढेच खरे की जो पर्यंत समाजातील स्त्रियांचे स्थान उंचावत नाही तो पर्यंत समाज पूर्णाशाने सुधरणार नाही आणि जेव्हा पुरूषप्रधान मानसिकता बदलेल तेव्हाच स्त्रियांना समाजात भारतीय समाजात मानाचे स्थान मिळेल यात शंका नाही.

**निष्कर्ष :–**

- भारतीय तत्त्वज्ञानाला वैचारिक बैठक आहे.
- भारतीय तत्त्वज्ञान हे धार्मिक तत्त्वावर आधारीत आहे.
- भारतीय समाजात स्त्री ही आस्तित्व हीन जीवन जगत आहे.
- स्त्री समानते शिवाय समाजाचा विकास होणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1. चोधरी पी.डी. 'भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास' सोमकुंवर पब्लिकेशन, वरूड पृष्ठ क. 01
2. रेगे मे.पुं. 'तत्वज्ञानातील समस्या', महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई.
3. साळुंखे आ.ह. 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' लोकवाङमय प्रकाशन गृह मुंबई.

Assistant Professor
Shivaji Col... li.
Tq.& Dist